**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**
**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**
**कार्यपत्रिका क्र. १२**
**सभावृत्तांत**

दिनांक :- १८/२/२०१५ वेळ :- दु. १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक १८/२/२०१५ रोजी दु. १२.०० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा. ओव्हाळ शेखर अशोक अध्यक्ष
२. मा.सुर्यंवशी आशा ज्ञानेश्वर
३. मा. शमीम पठाण
४. मा.अँड. चिंचवडे संदिप गुलाबराव
५. मा.चिंचवडेपाटील आश्विनी गजानन
६. मा.को-हाळे अनंत सुभाष
७. मा.साबळे छाया जगन्नाथ
८. मा. जगताप विमलताई सुरेश
९. मा.पवार अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा
१०. मा.बारणे निलेश हिरामण
११. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
१२. मा.विनय उर्फ विनायक गायकवाड

खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा. प्रशांत खांडकेकर - .क्षेत्रिय अधिकारी, मा.रविंद्र जाधव -,.प्रशासन अधिकारी तथा सचिव सभाशाखा, मा. रविंद्र दुधेकर - कार्यकारी अभियंता, स्थापत्य, मा. के.डी.फुटाणे - उप अभियंता, स्थापत्य, मा.एन.आर.निंबाळकर – उपअभियंता स्थापत्य, मा.सी.बी.कोंडे – उपअभियंता, स्थापत्य, मा.व्ही.एन.देसले- उपअभियंता, पाणीपुरवठा, मा.एम.एम.चव्हाण, उपअभियंता, विदयुत विभाग, , मा.सुधाकर कुदळे – उपअभियंता, जलनिसारण विभाग, मा.मिनानाथ इनामदार – लेखाधिकारी, श्री.बी.टी.बो-हाडे, कार्यालय अधिक्षक, मा.जे.एन.जानकार – सहा.आरोग्याधिकारी, मा.जी.एस.देशपांडे – मुख्य आरोग्य निरिक्षक, श्री.डी.एन.आढळे, उदयान निरिक्षक उदयान विभाग इत्यादी.

सर्वप्रथम मा. सभाध्यक्ष ओव्हाळ शेखर अशोक यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाजास सुरुवात केली.

तदनंतर **उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.२ थेरगांव व चिंचवड येथील दिशादर्शक व नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्र.३ मनपाच्या चिंचवड तानाजीनगर प्रभाग क्रमांक २३ मधील रुग्णालयाच्या विस्तारीकरण इमारतीतील बाहयरुग्ण विभागाचे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्र.४ प्रभाग क्र.२३ केशवनगर मध्ये चार ठिकाणी नागरीकांना बसण्यासाठी बैठक व्यवस्था करणेत आली असून त्यांचे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्र.५ प्रभाग क्रमांक ५२ ताथवडे पुनावळे येथील मुंबई पुणे हायवेच्या सबवे चौकाचे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्र.६ पुनावळे स.नं.८ येथे विकसित करणेत येणा-या उदयानास नाव देणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे.

तदनंतर मा.विनय उर्फ विनायक गायकवाड यांनी पुढीलप्रमाणे सुचना मांडली.

महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री व गृहमंत्री मा.आर.आर.पाटील यांचे दिनांक १६/२/२०१५ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले असलेने त्यांना श्रध्दांजली वाहून दिनांक १८/२/२०१५ रोजीची सभा तहकुब करणेत यावी व सदर सभा पुढील येणा-या दिनांकांस घ्यावी.

सदर सुचनेस मा. अॅड. संदिप गुलाबराव चिंचवडे यांनी अनुमोदन दिले.

त्याप्रमाणे मा.अध्यक्ष शेखर ओव्हाळ यांनी आज दिनांक १८/२/२०१५ रोजीची सभा तहकुब करुन सदर तहकुब सभा दिनांक २५/२/२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत तहकुब करणेत येत असल्याचे प्रकट केले.

सही/-
[ ओव्हाळ शेखर अशोक ]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचव महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बप्र/२/कावि/ ७८ /२०१५.
दिनांक : १ / ४ /२०१५

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत
सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**
**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**
**कार्यपत्रिका क्र. १२**
**( दिनांक १८/२/२०१५ रोजीची तहकुब सभा)**
**सभावृत्तांत**

दिनांक :- २५/२/२०१५ वेळ :- सकाळी ११.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक तहकुब सभा बुधवार दिनांक २५/२/२०१५ रोजी सकाळी ११.०० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा. ओव्हाळ शेखर अशोक अध्यक्ष
२. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३. मा.अँड. चिंचवडे संदिप गुलाबराव
४. मा.चिंचवडेपाटील आश्विनी गजानन
५. मा.को-हाळे अनंत सुभाष
६. मा.साबळे छाया जगन्नाथ
७. मा. पवार अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा
८. मा.बारणे निलेश हिरामण
९. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
१०. मा.यमुनाताई पवार

खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा. प्रशांत खांडकेकर - .क्षेत्रिय अधिकारी, मा.रविंद्र जाधव -,.प्रशासन अधिकारी तथा सचिव सभाशाखा, मा. रविंद्र दुधेकर - कार्यकारी अभियंता, स्थापत्य, मा.एम.एम.चव्हाण, उपअभियंता, विदयुत विभाग, मा.जे.एन.जानकार – आरोग्याधिकारी, मा.जी.एस.देशपांडे – मुख्य आरोग्य निरिक्षक, श्री.आर.एन.भाट , मुख्य आरोग्य निरिक्षक , पशुवैदयकिय विभाग , श्री.खोत एस.एच. कनिष्ठ अभियंता , श्री.मोने यु.एस. कनिष्ठ अभियंता , श्री.गांधी व्ही.के. कनिष्ठ अभियंता इत्यादी.

सर्वप्रथम मा. सभाध्यक्ष ओव्हाळ शेखर अशोक यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाजास सुरुवात केली.

तदनंतर मा.अँड.संदिप चिंचवडे यांनी पुढीलप्रमाणे सुचना मांडली.

आज दिनांक २५/२/२०१५ रोजीची मासिक तहकुब प्रभाग समिती सभेस अधिकारी वर्ग उपस्थीत नसलेने आजच्या सभेत निषेध व्यक्त करुन सदरची सभा तहकुब करणेत यावी. व सदरची सभा दिनांक २/३/२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता घेणेत यावी.

सदर सुचनेस मा.सौ.झामाबाई बारणे यांनी अनुमोदन दिले..

त्याप्रमाणे मा.अध्यक्ष शेखर ओव्हाळ यांनी आज दिनांक २५/२/२०१५ रोजीची सभा तहकुब करुन सदर तहकुब सभा दिनांक ०२/३/२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत तहकुब करणेत येत असल्याचे प्रकट केले.

सही/-
[ ओव्हाळ शेखर अशोक ]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचव महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बप्र/२/कावि/ ७८ /२०१५.
दिनांक : ०१ / ०४ /२०१५

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत
सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**
**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**
**कार्यपत्रिका क्र. १२**
**( दिनांक २५/२/२०१५ रोजीची तहकुब सभा)**
**सभावृत्तांत**

दिनांक :- २/३/२०१५ वेळ :- सकाळी ११.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक तहकुब सभा सोमवार दिनांक २/३/२०१५ रोजी सकाळी ११.०० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा. ओव्हाळ शेखर अशोक अध्यक्ष
२. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३. मा.शमीम पठाण
४. मा.अँड. चिंचवडे संदिप गुलाबराव
५. मा.चिंचवडेपाटील आश्विनी गजानन
६. मा.अपर्णा डोके
७. मा.जयश्री वसंत गावडे
८. मा.छाया जगन्नाथ साबळे
९. मा.विमलताई सुरेश जगताप
१०. मा. पवार अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा
११. मा.बारणे निलेश हिरामण
१२. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
१३. मा.यमुनाताई पवार

खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा. प्रशांत खांडकेकर - .क्षेत्रिय अधिकारी, मा.रविंद्र जाधव -,.प्रशासन अधिकारी तथा सचिव सभाशाखा, मा. रविंद्र दुधेकर - कार्यकारी अभियंता, स्थापत्य, मा.रामदास तांबे- कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा विभाग , मा.कोंडे सी.बी. उपअभियंता, स्थापत्य विभाग, मा.एन.आर.निंबाळकर, उपअभियंता, स्थापत्य विभाग, मा.के.डी.फुटाणे, उपअभियंता,स्थापत्य विभाग, मा.सुधाकर कुदळे, उपअभियंता,जलनिसारण विभाग, मा.व्ही.एन.देसले, उपअभियंता, पाणीपुरवठा विभाग, मा.एम.एम.चव्हाण, उपअभियंता, विदयुत विभाग, मा.बी.डी.बो-हाडे, कार्यालय अधिक्षक मा.जे.एन.जानकार – आरोग्याधिकारी, मा.जी.एस.देशपांडे – मुख्य आरोग्य निरिक्षक, श्री.डी.एन.आढळे, उदयान निरिक्षक उदयान विभाग इत्यादी.

सर्वप्रथम मा. सभाध्यक्ष ओव्हाळ शेखर अशोक यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाजास सुरुवात केली.

अ) तदनंतर मागील कार्यपत्रिका क्र. ११, दिनांक ३०/१/२०१५ रोजी झालेल्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.अध्यक्ष यांनी प्रकट केले.

ठराव क्र. ३४ विषय क्र. १
दि. ३/२/२०१५ विभाग : स्थापत्य
सुचक : मा. शेखर ओव्हाळ अनुमोदक: मा. अँड..संदिप चिंचवडे

संदर्भ :- मा.शेखर ओव्हाळ यांचा दिनांक १६/२/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

श्री. नंदकुमार भोंडवे यांनी पुनावळे सर्व्हे नंबर १२ मध्ये मनपास जागा दिली आहे. सदर जागेत पाण्याची टाकी विकसीत करणेत आलेली आहे. सदर सर्व्हे नंबर १२ हा भोंडवे यांचे मालकीचा असून, तो ओनर शिप स्कीम पध्दतीत विकसीत होत आहे. यास्तव या भागाची ओळख समजण्यासाठी सर्व्हे नंबर १२ या भागास भोंडवे इस्टेट असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच सदर ठराव कायम होणेची वाट न पहाता त्यावर तात्काळ कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्र. ३५ विषय क्र. २
दि. ३/२/२०१५ विभाग : स्थापत्य
सुचक : मा. झामाबाई बारणे अनुमोदक: मा. शमीम पठाण

संदर्भ :- मा.झामाबाई बारणे यांचा दिनांक १८/२/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

थेरगांव स.नं.२९ व २६ हया भागास बारणे इस्टेट असे नांव देणेस तसेच मनपा नकाशे व गुगलवर बारणे इस्टेट मतदार यादी व मनपा कामकाजात नामोल्लेख करणेस तसेच प्रभाग क्रमांक ५० मधील दगडू पाटील नगर पडवळनगर जगतापनगर क्रातीवीरनगर पेपर मील बारणे इस्टेट भागातील दिशादर्शक फलक व नांव देणेकामीचे विषय मंजूर झाले आहेत त्याठिकाणी दिशादर्शक फलक बसविणेस आणि संतोषनगर चिंचवड येथील चौकास पै.झब्बुलाल अहेर गवळी चौक असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला

-----

ठराव क्र. ३६ विषय क्र. ३
दि. ३/२/२०१५ विभाग : स्थापत्य
सुचक : मा. अपर्णा डोके अनुमोदक: मा.आशाताई सुर्यवंशी

संदर्भ :- मा.अपर्णा डोके यांचा दिनांक १८/२/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

महापालिकेच्या चिंचवड तानाजीनगर ब प्रभाग क्रमांक २३ मधील रुग्णालयाचे विस्तारीकरण करण्याचे काम पुर्ण झाले असून, रुग्णालयाचे बाहय रुग्ण विभागाचे माता रमाई आंबेडकर बाहयरुग्ण विभाग असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. तसेच सदरचा सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता त्यावर पुढील कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्र. ३७ विषय क्र. ४
दि. ३/२/२०१५ विभाग : स्थापत्य
सुचक : मा. अनंत को-हाळे अनुमोदक: मा.निलेश बारणे

संदर्भ :- मा.अनंत को-हाळे यांचा दिनांक १८/२/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक २३ केशवरनगर मध्ये चार ठिकाणी नागरीकांना बसणेसाठी बैठक व्यवस्था केली असून, त्यांचे नामकरण पुढे नमुद केलेप्रमाणे १) काकडेपार्क – कै.रुख्मीणी बाळकृष्ण गुरव सखीमंच २) काकडे पार्क – कै.निखील अशोक शिर्के मैत्री कटटा ३) काकडे टॉऊन शीप – ह.ब.प.पै. पांडुरंग भास्कर

खोल्लम – विरुंगळा कटटा ४) मोरया गोसावी क्रिडागण - कै.विजय जगन्नाथ पाटील विरुंगळा कटटा असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्र. ३८ विषय क्र. ५
दि. ३/२/२०१५ विभाग : स्थापत्य
सुचक : मा. यमुनाताई पवार अनुमोदक: मा. शेखर अशोक ओव्हाळ

संदर्भ :- मा.यमुनाताई पवार यांचा दिनांक १८/२/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ५२ ताथवडे पुनावळे येथील मुंबई पुणे हायवेच्या सबवे चौकास स्वर्गीय राजाभाऊ दर्शीले चौक असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. सदर ठराव कायम होणेची वाट न पहाता त्यावर पुढील कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला

-------

ठराव क्र. ३९ विषय क्र. ६
दि. ३/२/२०१५ विभाग : स्थापत्य
सुचक : मा. शेखर ओव्हाळ अनुमोदक: मा.अँड. चिंचवडे संदिप गुलाबराव

संदर्भ :- मा.शेखर ओव्हाळ यांचा दिनांक १८/२/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

पुनावळे येथे सर्व्हे नंबर ८ मध्ये उदयानासाठी आरक्षण आहे. सदर आरक्षण जागा ही मनपाच्या ताब्यात मिळाली असून, त्याठीकाणी उदयान विकसीत करणेत येत आहे. तरी पुनावळे येथील सर्व्हे नंबर ८ मधील उदयान आरक्षण जागेत विकसीत होणा-या उदयानास जिजाबाई भिकोबा ओव्हाळ उदयान असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. सदरचा ठराव कायम होणेची वाट न पहाता त्यावर पुढील तात्काळ कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

वरील प्रमाणे सभेचे कामकाज झाले मा.सभाध्यक्ष ओव्हाळ शेखर अशोक यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-
[ ओव्हाळ शेखर अशोक ]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचव महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बप्र/२/कावि/ ७८/२०१५.
दिनांक : ०१ / ०४ /२०१५ सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत
सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना